दि:09 फेब्रुवारी 2014

# कॉंग्रेस पक्षाने गेल्या दशकात सीबीआयचा कशाप्रकारे चलाखीने वापर केला

**अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

सीबीआय चे निदेशक श्री रंजीत सिन्हा यांचे एक वक्तव्य काल इकॉनॉमिक टाईम्स मध्ये छापून आले. सत्य हे जीभ घसरल्याने समोर आले. त्यांनी सांगितले की जर इशरत जहां प्रकरणात अमित शाह यांच्या विरोधात चार्जशीट दाखल झाली असती तर युपिए ला आनंद झाला असता. त्यांनी हे सुद्धा सांगितले की, अमित शाह यांच्या विरोधात सीबीआय ला कोणतेही पुरावे मिळाले नाहीत. त्यांच्या या वक्तव्यामुळे अपेक्षा होती की, सरकारच्या विरोधात अनेक प्रतिकूल टिप्पणी येतील, त्यामुळे सीबीआयच्या निदेशकांनी एक वक्तव्य जारी केले की त्यांचे वक्तव्य चुकीच्या पद्धतीने मांडण्यात येत आहे. कारण युपिए सरकारचा कार्यकाल समाप्त होत आहे. सीबीआय निदेशक यांचे वक्तव्य आणि स्पष्टीकरणाच्या वेगळे, जर सीबीआय च्या चलाखीमुळे या प्रक्रियेची गंभीरपणे चौकशी केली तर असे करणे उपयोगी होईल.
काही प्रकरणात काही गोष्टी लहान-मोठ्या करुन सादर करण्यासाठी पोलिस आणि चौकशी एजंसीचा वापर करणे कोणती असामान्य गोष्ट नाही. आणी-बाणीत राजनैतिक कार्यकर्त्यांच्या विरुद्ध जवळजवळ दोन लाख एफआयआर दाखल करण्यासाठी मनमर्जी गोष्टी केल्या गेल्या. अटक करण्यात आलेल्या लोकांना आंतरिक सुरक्षा देखभाल अधिनियम (मीसा) च्या अंतर्गत आणि बाकींना भारताच्या संरक्षण नियमांच्या अंतर्गत बंद करण्यात आले, ज्याचा संकट समयी असा प्रयोग केला जातो. पोलिसांनी जेवढी एफआयआर दाखल केली ती जवळपास एकसारखी होती. विरोधी राजनैतिक कार्यकर्त्यांवर आरोप लावण्यात येत होता की, ते सकाळच्या वेळी दुधाच्या डेपोत अथवा बसस्टॉपवर भाषण देऊन कॉंग्रेस सरकार हटविण्याचे विविध उपाय सांगत होते. अटक करण्यासाठी कोणतेही कारण नव्हते. खेदजन्य बाब अशी की, एकही पोलिस अधिका-याने दृढतेने विरोध करुन हे नाही सांगितले की, तो खोटी एफआयआर दाखल करणार नाही, अथवा कोणत्याही निर्दोष व्यक्तीला यामध्ये फसविणार नाही. आणी-बाणीत योगदान देण्यासाठी त्या सर्वांनी एकजूट केली होती.
युपिए 2004-2014 दरम्यान सीबीआयचा चलाखीने प्रयोग करण्यात निपुण झाली. या कालावधी मध्ये सीबीआय ही सरकारद्वारे नियंत्रित होत नव्हती. तर त्याला सत्तारुढ पक्ष नियंत्रित करित होती. सहजपणे वश होऊ शकेल अशा एका व्यक्तीचा सीबीआयच्या निदेशक रुपात निवड करण्यात आली. संस्थेच्या रुपात सीबीआय निदेशकाद्वारे चालविली जाते. त्यांच्या बोलण्यालाच मानले जाते. चौकशी अधिकारी कोणत्याही विशेष व्यक्तीवर दोषारोप करणे अथवा त्याला दोषमुक्त करण्याच्या इरादयाने चौकशी संबंधी फाईल तयार केली जाते. सर्व सीमा पार झाल्या आहेत, सेवानिवृत्त होण्याआधी निदेशकाला नवीन नोकरी देऊ केली जाते. त्यांना सेवानिवृत्तीच्या नंतर नोकरीच्या संदर्भात सल्ला दिला जातो. त्यामुळे त्यांना कुठेही सहजतेने वाकविले जाऊ शकते. निदेशकांच्या सेवानिवृत्तीच्या नंतर गवर्नर पासून युपीएससी चा सदस्य बनविले गेले आहे. एक विशेष निदेशक जे नुकतेच सेवानिवृत्त झाले आणि त्यांनी इशरत जहां प्रकरणात अमित शाह यांना फसविण्यामध्ये विशेष गोडी दाखविली त्यांना सेवानिवृत्तीच्या आधी जामिया मिलिया इस्लामिया चे कुलपती म्हणून नियुक्त करण्यात आले. वर्तमानपत्रात छापलेल्या बातम्यांमध्ये हे कळते की, सीवीसी च्या सतर्कता आयुक्त पदी नियुक्ती करण्यासाठी त्यांचे नाव शॉर्टलिस्ट करण्यात आले होते.
पंतप्रधानांना लिहिण्यात आलेल्या एका विस्तृत पत्रामध्ये मी नुकतेच या गोष्टीबद्दल विस्तृतपणे सांगितले होते की, कोणत्याही प्रकारे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांना जसे की, अमित शाह, गुलाबचंद कटारिया आणि राजेंद्र राठोड यांना सीबीआयने चुकीच्या पद्धतीने फसविले आहे. अमित शाह प्रकरणात उच्च न्यायालयाने त्यांना हे सांगून जामीन दिला होती की, त्यांच्या विरुद्ध प्राथमिक दृष्ट्या कोणतेही प्रकरण होऊ शकत नाही. गुलाबचंद कटारिया यांच्या विरुद्ध स्पष्टपणे खोटे प्रकरण होते ज्यामुळे विशेष न्यायाधीश यांनी अग्रीम जामीन दिला. राजेंद्र राठोड प्रकरणात विशेष न्यायाधीश यांनी आरोप निश्चित होण्याच्या वेळीच त्यांची सुटका केली. याच्या उलट समाजवादी पक्ष आणि बसपा यांच्या बाहेरुन समर्थनामुळे युपिए अल्पमतवाल्या सरकारच्या रुपात सत्तेत टिकून आहे. दोन्हीही प्रकरणात सीबीआयच्या सहयोगामुळे या दोन्ही पक्षांचे समर्थन मिळविण्यासाठी जोड-तोड करण्यात आली. त्यांच्या वरिष्ठ नेत्यांवर आय पेक्षा अधिक संपत्ती मिळविल्याचा आरोप आहे.
सीबीआयचे निदेशकाचे खंडन की, इकॉनॉमिक टाईम्सने त्यांच्या ज्या वक्तव्याला प्रकाशित केले होते त्याला कोणतेही महत्त्व नाही. सीबीआयला

सहजतेने प्रभावित करणे अथवा झुकविण्याच्या संदर्भात अनेक प्रमाण उपलब्ध आहेत.